| MHAH160007902020 | दाखल दिनांक | :– | ०३.०८.२०२० |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :– | ०३.०८.२०२० |
| | निकाल दिनांक | :– | ०२.०८.२०२३ |
| | कालावधी | :– | वर्ष महिने दिवस, |
| | | | ०२ ११ २९ |

**अकोले येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, ता.अकोले, जि.अहमदनगर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी श्री. आर. के. गायकवाड )

न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ०२ ऑगस्ट, २०२३

(नियमीत फौजदारी खटला क्रं.१०२/२०२०) **नि.३७**

गुन्हा नोंद क्रं.२१०/२०१८, अकोले पोलिस स्टेशन, अकोले ता. अकोले.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलिस निरीक्षक,<br>अकोले पोलिस स्टेशन, अकोले,<br>ता.अकोले. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती वाकचौरे. |
| आरोपी | | **१.भाउसाहेब बाबुराव साबळे,**<br>वय वर्षे – ६० वर्षे,<br>**२.राहुल भाउसाहेब साबळे,**<br>वय वर्षे – ३२ वर्षे,<br>**३.संतोष भाउसाहेब साबळे,**<br>वय वर्षे – ३० वर्षे,<br>क्र. १ ते ३ रा.बोरी ता.अकोले,<br>जि.अहमदनगर. |

| | | |
|---|---|---|
| | | **४.मनिषा मच्छींद्र पोखरकर,**<br>वय वर्ष – ३४ वर्षे,<br>रा.कासारवाडी, ता.संगमनेर,<br>जि.अहमदनगर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड. श्री.डी.एम.काकड. |

**भाग–**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १२.११.२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १२.११.२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०३.०८.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०२.०८.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०२.०८.२०२० |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | नाही. |
| न्यानिर्णय दिनांक | :– | ०२.०८.२०२३ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक. आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| १. | भाउसाहेब बाबुराव साबळे | २१.११.२०१८ | २१.११.२०१८ | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ ५०६व ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | राहुल भाउसाहेब साबळे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३. | संतोष भाउसाहेब साबळे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ४. | मनिषा मच्छींद्र पोखरकर | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | विमल कारभारी साबळे | फिर्यादी | नि. ३२ |
| २. | कारभारी रामु साबळे | साक्षीदार | नि. ३४ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३३ | फिर्यादीवरील सही |
| २. | ३५ | घटनाठिकाण पंचनामा |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ०२.०८.२०२३ रोजी घोषित केले)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०६ सहकलम ३४ नुसार गुन्हा केलेचे आरोपांबाबत चालविण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे** –

**२.** फिर्यादी विमल कारभारी साबळे या कुटूंबासह मौजे बोरी कोतुळ ता.अकोले, जि.अहमदनगर येथे राहतात. त्यांनी दिनांक १२.११.२०१८ रोजी अकोले पोलीस ठाण्यात हजर होवून कळविले की, त्या शेतामध्ये जनावर चारत असताना आरोपींनी तिथे येवून त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली त्यांचे पतीने आरोपींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांच्या पतीला लाकडी काठीच्या सहयाने मारहाण करुन जखमी केले. आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. सबब फिर्यादीने अकोले पोलीस ठाण्यात हजर होवून झालेल्या घटनेबाबत अकोले पोलीसांनी फिर्याद नोंदवुन घ्यावी म्हणून फिर्यादीने विनंती केली.

**३.** फिर्यादीच्या फिर्यादीवरुन अकोले पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द गु.र.क्र. २१०/२०२३ नोंदविण्यात आला. त्याचा तपास पोलिस नाईक एस.आर.साळवे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी तपासदरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि इतर आवश्यक तो तपास केला. तसेच त्यांच्या तपासात आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन आलेने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द **नि.२७** कडे दोषारोप निश्चीत केले. आरोपीनी गुन्हा मान्य नसल्याचे नमूद करून संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. अभियोग पक्षाने **नि.३३** कडील फिर्यादीची अंगठा वगळता इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. आरोपीकडून घटनाठिकाणाचा पंचनामा नि. ३५ मान्य करण्यात आले आहे. अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्यात आरोपींना गुन्हयात गुंतविणारा कोणताही सबळ पुरावा आढळुन आला नाही त्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

६. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कषार्थ खालील मुद्दे निघतात. त्याचे उत्तरे मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिली आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने क्र. १ ते ३ यांनी संगनमताने इच्छापुर्वक दिनांक १२.११.२०१८ १४.०० मौजे बोरी गावाचे शिवारात, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे फिर्यादीचे पतीला लाकडी काठीने म्हणजेच अशा वस्तुने की, ज्याचा शस्त्र म्हणून वापर केला असता प्राणघातक ठरेल अशाने मारहाण करुन जखमी केले असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| २ | आरोपींनी संगनमताने उपरोक्त ठिकाणी, दिवशी व वेळी फिर्यादीला इच्छापुर्वक लाथा बुक्यांनी मारहाण केली होती असे अभियोगपक्ष सिध्द | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | करतो काय ? | |
| ३ | आरोपींनी उपरोक्त ठिकाणी, दिवशी व वेळी फिर्यादीला आणि साक्षीदारांना त्यांच्याकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा या उददेशाने जाणीवपुर्वक प्रक्षोभन दिले असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ४ | आरोपींनी संगनमताने उपरोक्त ठिकाणी, दिवशी व वेळी इच्छापुर्वक फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा देवून जिवे ठार मारण्याची धमकी दिली असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ५ | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष सोडण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ करिता**

**७.** अभिलेखावर आलेला एकंदरीत पुरावा पाहता मुददे क्रमांक १ ते ४ चे अनुषंगाने आरोपींवर लादलेले आरोप सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने अभिलेखावर केवळ फिर्यादी विमल कारभारी साबळे नि. ३२ आणि साक्षीदार कारभारी रामु साबळे नि.३४ यांचा पुरावा आणलेला आहे. या शिवाय अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षीदारांचा पुरावा अभिलेखावर दाखल नाही. अभियोगपक्षाच्या वतीने अभिलेखावर फिर्याद वरील फिर्यादीची अंगठयाचा ठसा नि.३३ शाबीत झाला आहे. आरोपीकडून घटना ठिकाणचा पंचनामा नि. ३५ मान्य करण्यात आले आहे. सबब फिर्यादीला घटनाठिकाण हे सिध्द झालेले आहे ही बाब समोर येते आहे. मात्र अभिलेखावर वैदयकिय प्रमाणपत्र दाखल नाही असे दिसुन येते. तरीही फिर्यादीला आणि साक्षीदारांना जखमा झाल्या होत्या असे गृहित धरुन सदर जखमा आरोपींनी केलेल्या मारहाणीमध्ये झाल्या होत्या काय ही बाब अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द केली आहे काय याचा मागावा घेताना असे दिसुन येते की,

अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणी केवळ फिर्यादी विमल कारभारी साबळे नि. ३२ आणि साक्षीदार कारभारी रामु साबळे नि.३४ यांचा पुरावा दाखल केलेला आहे. मी अभिलेखावरील पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन केलेले आहे. अभिलेखावरील पुरावा पाहता असे दिसुन येते की, नमुद साक्षीदाराने त्यांच्या पुराव्यात अभियोगपक्षाचे संपुर्ण कथन नाकारले असून त्यांना फितुर घोषीत करण्यात आले, त्यांना विचारलेल्या उत्तरसुचक प्रश्नांमध्येही अभियोगपक्षास मदत होईल अशी कोणतीही कबुली आलेली नाही. सबब सदर साक्षीदाराचा पुरावा हा आरोपींवर लादलेले आरोप सिध्द करण्याकरिता पुरेसा नसल्याचे दिसुन येते.

८. मी अभिलेखावर असलेला इतर उर्वरीत पुरावा काळजीपुर्वक अभ्यासला आहे. पुराव्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात अभियोपक्षाने इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष समोर आणलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात पंच साक्षीदार, तपासी, अमंलदार, इतर निपक्षः साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर उपलब्ध नाही. कोणत्याही गुन्हयाचे सिध्दता तपासण्याकरिता अभिलेखावर पंच साक्षीदार, तपासी, अमंलदार, इतर निपक्षः प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि इतर पुराव्याची आवश्यकता असते अन्यथा न्यायालय योग्य त्या निष्कार्षापर्यंत पोहचणे शक्य होत नाही. प्रस्तुत प्रकरणात अशा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही ही बाब दिसुन येते. यावरुनच प्रस्तुत प्रकरणात आरोपींवरील आरोप संशयापलीकडे जावून सिध्द होत नाहीत हे अधोरेखांकित होत आहे. थोडक्यात आरोपीवर लादण्यात आलेले आरोप अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द केले नाहीत ही बाब दिसुन येते. सबब मी मुददा क्रमांक १ ते ४ ची उत्तरे नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करिता</u>**

९. मुददा क्रमांक १ ते ४ ची कारणमिमांसा पाहता आरोपीवर लादण्यात आलेले आरोप अभियोगपक्षाने संशयापलीकडे जावून सिध्द केलेले नाहीत. सबब आरोपी त्यांच्यावर लादलेले आरोपांतुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. आरोपींच्या विधिज्ञांनी नि. ३६ कडे अर्ज देवून अगोदर दिलेले जामीनपत्र कायम करण्यात यावेत

अशी विनंती केली आहे. सबब मी मुद्दा क्र.५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

| आदेश | |
|---|---|
| १. | आरोपी भाउसाहेब बाबुराव साबळे, राहुल भाउसाहेब साबळे, संतोष भाउसाहेब साबळे आणि मनिषा मच्छींद्र पोखरकर यांना भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ या आरोपांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीने यापुर्वी दिलेले फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसारचे वैयक्तिक जात मुचलका व रोख रकमेचे बंधपत्र हे सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहिल व त्यानंतर ते आपोआप रदद होईल. |
| ३. | जप्त मुददेमाल लाकडी काठी ही मुल्यहिन असल्याने अपील कालावधीच्या समाप्तीनंतर ती नष्ट करण्यात यावी. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

RAHUL KESHAVRAO GAIKWAD

Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2023.08.02 16:33:27 +0530

दिनांक ०२/०८/२०२३ (श्री.आर.के. गायकवाड)

अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.